नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १७७ Issue - 177 | वार गुरुवार दि. १४ नोव्हेंबर २०२४ Blow- Thursday Date 14 November 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## वक्फ मंडळ कायदा नरेंद्र मोदीच बदलणार

### केंद्रीय मंत्री अमित शहा यांचा विश्वास; राहुल गांधींवर टीका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जळगाव, धुळे : वक्फ मंडळासंदर्भातील कायदा बदलणे गरजेचे झाले आहे. राहुल गांधी यांचा त्यास विरोध आहे. परंतु, कितीही विरोध झाला तरी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे वक्फ मंडळ कायदा बदलणारच, असा दावा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केला. काँग्रेससाठी महाराष्ट्र हे फक्त पैशांनी भरलेले 'एटीएम' असून महाविकास आघाडीची सत्ता आल्यानंतर ते राज्यातील सर्व पैसा दिल्लीला घेऊन जातील, असा धोकाही त्यांनी व्यक्त केला.

महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ बुधवारी अमित शहा यांच्या उत्तर महाराष्ट्रातील शिंदखेडा आणि चाळीसगाव मतदारसंघात सभा झाल्या. या सभांमध्ये शहा यांनी महाविकास आघाडीवर टीकास्त्र सोडतानाच महायुती सरकारच्या योजनांचे कौतुक केले. महाविकास आघाडीवाले ठिकठिकाणी दंगल घडवून आणत आहेत. दंगलखोरांना आघाडीकडून



पुढे केले जात आहे. यामुळे हे लोक राज्याच्या हिताचे नाहीत, असे शहा म्हणाले. जी व्यक्ती मुख्यमंत्री असताना कोरोनाचे निमित्त करून घरातच बसून होती; ती व्यक्ती आता महाराष्ट्र वाचविण्याची भाषा करत आहे, अशी टीका शहा यांनी उद्धव ठाकरेंवर केली. राहुल गांधी हे मुस्लिमांना आरक्षण देण्याची मागणी करीत आहेत, मात्र हे आरक्षण द्यायचे असेल, तर मागासवर्गाला देण्यात आलेले आरक्षण काढून घ्यावे लागेल. यामुळे राहुल गांधी यांची मागणी कधीच पूर्ण होऊ शकणार नाही, असेही शहा यांनी अधोरेखित केले.

## थोडक्यात

### झारखंडमध्ये दुपारी ३ वाजेपर्यंत ५९ टक्के मतदान

नवी दिल्ली : महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना झारखंडमध्ये पहिल्या टप्प्यातील मतदान प्रक्रिया आज पार पडत आहे. पहिल्या टप्प्यात १३ नोव्हेंबरला ४३ जागांसाठी तर उर्वरित ३८ जागांसाठी दुसऱ्या टप्प्यात २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. 'इंडिया' आणि रालोआ (राष्ट्रीय लोकशाही आघाडी) अशा दोन्ही आघाड्यांमध्ये अत्यंत चुरशीची लढत होत आहे. भाजपाने केलेल्या जोरदार टीकेला काँग्रेसचे प्रत्युत्तर, आरोपांच्या फैरी आदींनी निवडणूक प्रचाराचा पहिला टप्पा गाजला. पहिल्या टप्प्यातील सकाळच्या सत्रात आतापर्यंत १३. ४ टक्के मतदान झालं. तर, दुपारी एक वाजेपर्यंत ४६. २५ टक्के मतदान झालं. दुपारी तीन वाजेपर्यंत ५९.२८ टक्के मतदान झालं आहे. दरम्यान, 'झारखंडमध्ये आदिवासींची लोकसंख्या झपाट्याने घटत आहे. येथे भाजपाचे सरकार आल्यास घुसखोरांची ओळख पटवून त्यांना हुसकावून लावण्यासाठी एक समिती स्थापन केली जाईल तसेच त्यांनी बळकावलेल्या जमिनीवर पुन्हा दावा केला जाईल, आदिवासी महिलांशी विवाह करणाऱ्या घुसखोरांना जमिनीचे हस्तांतरण रोखण्यासाठी कायदा आणला जाईल, अशी घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सोमवारी प्रचाराच्या शेवटच्या दिवशी केली. पहिल्या टप्प्यात बुधवारी होणाऱ्या मतदानाबाबतही नियमावली ठरवण्यात आली आहे. मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, शौचालय आणि वेब कास्टिंगची सुविधा दिली गेली आहे.



## 'बुलडोझर कारवाई'बाबत सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निकाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : काही दिवसांपासून सर्वोच्च न्यायालयात सुनावणी चालू असलेल्या 'बुलडोझर कारवाई'बाबतच्या खटल्यात अखेर आज निकाल आला आहे. न्यायालयाने अशा प्रकारे फक्त गुन्ह्याचा आरोप असणाऱ्या व्यक्तीच्या घरावर बुलडोझर कारवाई करणं चुकीचंच नसून घटनाविरोधी असल्याची परखड टिप्पणी केली. न्यायमूर्ती बी. आर. गवई व न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची अंतिम सुनावणी होऊन आज निकाल जारी करण्यात आला. यावेळी न्यायमूर्तींनी निकालपत्रातील महत्त्वाचा हिस्सा न्यायालयात वाचून दाखवला.

सर्व बाजू ऐकल्यानंतर आम्ही या निष्कर्षाप्रत आलो आहोत की जर प्रशासनाकडून एखाद्या व्यक्तीच्या घरावर फक्त यासाठी पाडकामाची कारवाई केली गेली की ती व्यक्ती एखाद्या गुन्ह्यात आरोपी आहे, तर ती कारवाई कायद्याचं राज्य तत्वाच्या पूर्णपणे विरोधात आहे. जर अशा प्रकरणात प्रशासकीय अधिकाऱ्याने एखाद्या न्यायाधीशाप्रमाणे गुन्ह्याचा आरोप असणाऱ्या व्यक्तीला पाडकामाच्या कारवाईची शिक्षा दिली, तर न्यायपालिका व कायदेमंडळ यांच्यातील अधिकार विभागणीच्या तत्वाचा हा भंग आहे, असं न्यायमूर्तींनी यावेळी नमूद केलं. दरम्यान, यावेळी न्यायमूर्तींनी अशा प्रकरणात संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांनाच जबाबदार धरण्याचे निर्देश दिले. आमचं असं मत आहे की अशा प्रकरणांत कायदा हातात घेणाऱ्या अधिकाऱ्यांनाच अशा प्रकारच्या गंभीर कृत्यासाठी दोषी धरलं गेलं पाहिजे. अधिकाऱ्यांकडून अशा प्रकारे मनमानी पद्धतीने काम केलं जाऊ नये, यासाठी निश्चित अशी नियमावली तयार व्हायला हवी. यामुळे प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारावर वचक बसेल, असंही न्यायालयाने आपल्या निकालपत्रात म्हटलं आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने यावेळी अशा कारवाईसंदर्भात कोणत्या नियमांचं पालन केलं जायला हवं, याबाबतची नियमावली दिली आहे. त्यात अशा प्रकारच्या कारवाईआधी नोटीस पाठवणं बंधनकारक करण्यता आलं आहे. त्याशिवाय, पाठवलेल्या नोटीसच्या वैधतेवर आक्षेप घेण्यात आल्यास त्यानुसार कारणमीमांसा करून नंतर पुन्हा तर्कसंगत नोटीस जारी करण्यात यावी. यानंतरही संबंधित व्यक्तीने आदेशांचं पालन केलं नाही, तर सक्षम प्राधिकरणाकडून त्याविरोधात अतिक्रमण हटवण्याची कारवाई केली जावी. अतिक्रमण निश्चित करण्यासाठी अभिलेख, नकाशांच्या आधारे सर्वेक्षण केलं जावं, अशा काही मुद्द्यांचा समावेश आहे.

## रोमहर्षक सामन्यात भारताने मारली बाजी! तिलक वर्माचा शतकी तडाखा, मालिकेत २-१ घेतली आघाडी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारतीय संघाने रोमहर्षक सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा ११ धावांनी पराभव करत चार सामन्यांच्या टी-२०-मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली आहे. तिलक वर्माच्या शतकाच्या जोरावर भारताने २० षटकांत ६ बाद २१९ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकेच्या संघाला निर्धारित षटकांत सात विकेट्सच्या मोबदल्यात केवळ २०८ धावाच करता आल्या आणि त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. दक्षिण आफ्रिकेकडून मार्को यान्सेनने झुंजार खेळी साकारली. तो जोपर्यंत खेळपट्टीवर होता, तोपर्यंत भारत जिंकेल याची शाश्वती नव्हती. मात्र, तो मोक्याच्या क्षणी बाद झाल्याने भारताने विजयावर शिक्कामोर्तब केला. तत्पूर्वी, त्याने १७ चेंडूंत चार चौकार आणि पाच षटकारांच्या मदतीने ५४ धावांचे योगदान दिले.

मार्को यान्सेनने अवघ्या १६ चेंडूत अर्धशतक झळकावले, जे त्याच्या टी-२० कारकिर्दीतील पहिले अर्धशतक आहे. यान्सेनने संघाला विजयापर्यंत नेण्याचा पुरेपूर प्रयत्न केला, मात्र अर्शदीपने त्याला अखेरच्या षटकात बाद करत दक्षिण आफ्रिकेची शेवटची आशा संपुष्टात आणली. दक्षिण आफ्रिकेसाठी हेनरिक क्लासेनने २२ चेंडूत एक चौकार आणि चार षटकारांच्या मदतीने ४१ धावा केल्या. अर्शदीपने क्लासेनलाही बाद केले. भारताकडून अर्शदीपने तीन, वरुण चक्रवर्तीने दोन आणि हार्दिक पंड्या आणि अक्षर पटेलला प्रत्येकी एक विकेट मिळाली.

यासह अर्शदीप सिंग भारताचा टी-२० क्रिकेटमधीले दुसरा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला आहे. अर्शदीपने क्लासेनला बाद करून भुवनेश्वर कुमारला मागे टाकले. अर्शदीपच्या नावावर आता ९२ विकेट्स असून त्याने जसप्रीत बुमराह आणि भुवनेश्वर कुमारला मागे टाकले आहे. त्याच्या पुढे आता फिरकी गोलंदाज युजवेंद्र चहल आहे, ज्याने या फॉरमॅटमध्ये ९६ विकेट घेतल्या आहेत. तत्पूर्वी, तिलक वर्माचे शतक आणि अभिषेक शर्माच्या अर्धशतकाच्या जोरावर भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेसमोर तिसऱ्या टी-२० सामन्यात २२० धावांचे लक्ष्य ठेवले होते. भारतासाठी, तिलने टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील पहिले शतक झळकावले, ज्यामुळे भारतीय संघ २०० धावांचा टप्पा पार करण्यात यशस्वी ठरला. भारताने टी-२० मध्ये २०० हून अधिक धावा करण्याची या वर्षातील ही आठवी वेळ आहे.

## विकास विरोधी, शिवसेनेचा विचार काँग्रेसच्या दावणीला बांधलेले सरकार उलथवून टाकले

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे महाविकास आघाडी सरकारवर टीकास्त्र

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कल्याण – महाराष्ट्राला अधोगतीकडे नेणारे विकासविरोधी, शिवसेनाप्रमुखांचे विचार आणि धनुष्यबाण ज्यांनी काँग्रेसच्या दावणीला बांधले, असे महाविकास आघाडीचे सरकार आपण उलथवून टाकले. असे केले नसते तर कल्याण पश्चिमेसह महाराष्ट्रात विकासाची गंगा आज निर्माण झाली नसती, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी येथे महाविकास आघाडीच्या



सरकारवर केली.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात औद्योगिक क्षेत्रात देशात महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर फेकला गेला होता. महायुतीचे सरकार राज्यात येताच पुन्हा उद्योग, व्यवसाय, गुंतवणूक, नवउद्यमी, पायाभूत सुविधांमध्ये राज्य प्रथम क्रमांक आणण्यात यशस्वी झाले. राज्यातील आघाडीचे सरकार उलथून टाकले नसते तर आपण आणखी अधोगतीकडे गेलो असतो. त्यामुळे वेळेतच हे सरकार आपण उलथून टाकल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

शिवसेनेची कधीही काँग्रेस होऊ देणार नाही. तसे झाले तर माझे दुकान मी बंद करीन असे शिवसेनाप्रमुख सांगायचे. पण यांनी मुख्यमंत्री पदाचा मोह, स्वार्थासाठी काँग्रेसच्या दावणीला शिवसेना पक्षाला बांधले, अशी टीका त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली. शिवसेनाप्रमुखांचे विचार समोर ठेऊन जे घडले ते सहन न झाल्याने आपण महाविकास आघाडीचे सरकार उलथून टाकले, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

महायुतीचे कल्याण पश्चिमेतील महायुतीचे उमेदवार विश्वनाथ भोईर, कल्याण ग्रामीणमधील महायुतीचे उमेदवार राजेश मोरे यांच्या दोन स्वतंत्र सभांमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी (पान २ वर...)

**उमेदवार राजन तेली यांच्या प्रचारार्थ सभा**

**उद्धव ठाकरेंचा इशारा**

## कोकण आणि शिवसेनेचे नाते तोडण्याचा प्रयत्न, कोकणचे अदानीकरण होऊ देणार नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सावंतवाडी : कोकण आणि शिवसेनेचे अतुट नाते पूर्वीपासूनचे आहे. शिवसेना – कोकण नात्यात संभ्रम निर्माण करून तोडण्याचा प्रयत्न सुरू आहे, तो कदापि यशस्वी होऊ द्यायचा नाही. कोकण म्हणजे आपले आयुष्य ते गुंडा-पुडांच्या ताब्यात देऊन उपयोगाचे नाही तसेच कोकणचे अदानीकरण होऊ देणार नाही असा इशारा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिला. यादरम्यान ठाकरे यांनी सावंतवाडीचे आमदार दीपक केसरकर यांच्यावर टीका करताना खाली मुंडी पाताळ धुंडीमनी नाही भाव देवा मला पाव असे म्हणत केसरकर यांचा पराभव झाल्यानंतर सिंधुदुर्ग जिल्ह्याचे चांगले होईल असा टोला हाणला. महाविकास आघाडीचे उमेदवार राजन तेली यांच्या प्रचारार्थ शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, शिवसेना नेते विनायक राऊत, माजी खासदार ब्रिगेडीअर सुधीर सावंत, माजी राज्यमंत्री प्रवीण भोसले, माजी आमदार परशुराम उपरकर, शिवसेना उपनेते शरद कोळी, विधानसभा संपर्क प्रमुख शैलेश परब, जिल्हाप्रमुख बाबुराव धुरी, माजी नगराध्यक्ष बबन साळगावकर, जिल्हा बँक माजी अध्यक्ष सतीश सावंत, काँग्रेस जिल्हाध्यक्ष इर्शाद शेख, विधानसभा प्रमुख रूपेश राऊळ, माजी सभापती जयप्रकाश चमणकर, रेवती राणे, डॉ जयेंद्र परुळेकर, आदी उपस्थित होते.

शिवसेनेत प्रवेश केलेल्या माजी खासदार ब्रिगेडीअर सुधीर सावंत यांना शिवबंधन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी बांधले ते म्हणाले, कोकण आणि शिवसेना हे अतुट नाते आहे. शिवसेनेत राजन तेली परशुराम उपरकर हे पुन्हा परतले तर सुधीर सावंत यांनी आज प्रवेश केला आहे. सर्व मिळून एकत्रित काम करतील. आमदार केसरकर यांच्यावर टीका करताना ठाकरे म्हणाले, आताचे आमदार खाली मुंडी पातळ धुंडी, खाली बघून बोलतात सज्जन सभ्य माणूस वाटला. साईबाबांच्या श्रद्धा



आणि सबुरी हा मंत्र तो विसरला त्याच्या मनी श्रद्धाही नाही सबुरीही नाही, मनी नाही भाव देवा मला पाव असे ते असल्याची टीका केली.

ठाकरे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या मालवणीतील पुतळ्यात मोठा भ्रष्टाचार झाला आहे, तो पैसे खाऊन केला आहे, मोदी हे शिवभक्त नाही, ऊन वारा पाऊस, लाटा सहन करून सिंधुदुर्ग किल्ला उभा आहे मात्र दाढीवाले मिंधे हा पुतळा वाऱ्याने पडला म्हणताहेत. हा खाली मुंडी पातळ धुंडी म्हणतोय, वाईटातून चांगलं होतं असं म्हणणाऱ्या केसरकर यांचा पराभव झाल्यानंतर सिंधुदुर्ग जिल्ह्याचे चांगलं होणार असे ठाकरे म्हणाले.

ठाकरे म्हणाले, खाण मालक, हॉटेल उद्योजकाच्या चरणी केसरकर यांनी आपली लाज वाहून टाकली आहे. सावंतवाडीला मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल मी दिले ते झाले नाही. केसरकर व हॉटेल उद्योजक सिंधुदुर्ग कोल्हापूरच्या सीमेवर उद्योगपती अदानीला गोल्फ कोर्स साठी जागा शोधत आहे. ते अदानी चे दलाल बनून कोकण च्या सातबारावर अदानी नामकरण करण्याच्या प्रयत्नात आहेत .पण कोकणचे अदानीकरण होऊ देणार नाही. कोकण आपल्या हक्काचे आहे ते अदानी च्या घशात घालायला देणार नाही. धारावीत अदानी च्या घशात घातलेली जमीन महाविकास आघाडी सत्ता आल्यानंतर पुन्हा काढून घेऊन गिरणी कामगारांच्या घरांना दिली जाईल.

ते म्हणाले, मी मुख्यमंत्री असताना सर्व शेतकऱ्यांना कर्जमुक्ती दिली आज लोकसभेच्या निवडणुकीत पराभव झाल्यानंतर यांना लाडकी बहीण, शेतकरी आठवलेत. आम्ही बोलल्याप्रमाणे करतो. दहा वर्षांपूर्वी सिंधुदुर्ग जिल्ह्यात दहशत होती या ठिकाणी विनायक राऊत यांना पाठवले विनायक राऊत ठाण मांडून बसलेत आणि दहशतमुक्त सिंधुदुर्ग जिल्हा करून ते दोनदा खासदार झालेत. कोकणने पुन्हा एकदा उभारी घेतली.महाराष्ट्र गुजरातच्या चरणी वाहणाऱ्यांना जनता यावेळी धडा शिकवेल आमचा महाविकास आघाडीचा वचननामा आहे मुला मुलींना मोफत शिक्षण, ज्येष्ठ नागरिक, लाडक्या बहिणी सगळ्यांना योजना ,आरोग्यासाठी २५ लाख चा कॅशलेस मेडिक्लेम दिला जाईल.

ठाकरे म्हणाले, आज पर्यंत गद्दारांना भाव होता. मात्र लोकसभेच्या निवडणुकीनंतर लाडक्या बहिणीं आणि शेतकऱ्यांची या लोकांना आठवण झाली. गुंडगिरी पुंडगिरी मला हेलिकॉप्टर येऊ नका रस्त्याने या म्हणून आव्हान दिले मी रस्त्याने आलो आहे. मालवण राजकोट येथील शिव पुतळा कोसळल्यानंतर शिवद्रोही , महाराष्ट्र द्रोही एकत्र झाले. काळे कृत्य खुप झाली पण आता सावंतवाडी पासून कोकणपट्टी आणि मुंबई पर्यंत भगवा झेंडा डौलाने फडकला पाहिजेत. यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेतला पाहिजे.

महाविकास आघाडीच्या बंडखोरीवर बोलताना ठाकरे म्हणाले, महाविकास आघाडीमध्ये बंडखोरीला स्थान नाही जागावाटपाच्या वेळी प्रत्येक पक्षाला मतदार संघ सुटला होता. तरीसुद्धा महाविकास आघाडीचे सत्तेत येण्यासाठी बंडखोरीला वाव दिला जाऊ नये बंडखोरी झाल्याने सर्वांनी एकत्रित जिंकण्याचे आवाहन त्यांनी केले यावेळी राजन तेली जिंकतील असा आशावाद ठाकरे यांनी व्यक्त करून ते लोकसभेच्या दरम्यान आले असते तर लोकसभा निवडणूक सुद्धा जिंकलो असतो. शैलेश परब, रूपेश राऊळ, बाबुराव धुरी,बबन साळगावकर, परशुराम उपरकर, राजन तेली असे सर्व मंडळी एकजूट दाखवतील असे ते म्हणाले

**माझ्या मुलावर दोन वेळा हल्ला**

राजन तेली म्हणाले, माझ्या मुलावर दोन वेळा हल्ला झाला. मुलांसाठी बाप म्हणून मी धावून गेलो. कदाचित यापुढे धोका निर्माण होऊ शकतो. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी कुटुंबाला आधार द्यावा. मी धोका पत्करून लढण्याची प्रतिज्ञा केली आहे.

## संपादकीय....

# रणधुमाळी

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचा धूमशान सुरु आहे. महायुती, महाविकास आघाडी व इतर पक्षांच्या सभा, बैठकांना ऊत आला आहे. सर्वच पक्ष एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करीत आहेत. धुळे येथील सभेत अमित शहा म्हणाले की, वक्फ मंडळासंदर्भातील कायदा बदलणे गरजेचे झाले आहे. राहुल गांधी यांचा त्यास विरोध आहे. परंतु, कितीही विरोध झाला तरी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे वक्फ मंडळ कायदा बदलणारच, असा दावा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केला. काँग्रेससाठी महाराष्ट्र हे फक्त पैशांनी भरलेले 'एटीएम' असून महाविकास आघाडीची सत्ता आल्यानंतर ते राज्यातील सर्व पैसा दिल्लीला घेऊन जातील, असा धोकाही त्यांनी व्यक्त केला. तसेच महाराष्ट्राला अधोगतीकडे नेणारे विकासविरोधी, शिवसेनाप्रमुखांचे विचार आणि धनुष्यबाण ज्यांनी काँग्रेसच्या दावणीला बांधले, असे महाविकास आघाडीचे सरकार आपण उलथवून टाकले. असे केले नसते तर कल्याण पश्चिमेसह महाराष्ट्रात विकासाची गंगा आज निर्माण झाली नसती, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी येथे महाविकास आघाडीच्या सरकारवर केली. दरम्यान कोकण आणि शिवसेनेचे अतुट नाते पूर्वीपासूनचे आहे. शिवसेना - कोकण नात्यात संभ्रम निर्माण करून तोडण्याचा प्रयत्न सुरू आहे, तो कदापि यशस्वी होऊ द्यायचा नाही. कोकण म्हणजे आपले आयुष्य ते गुंडा-पुडांच्या ताब्यात देऊन उपयोगाचे नाही तसेच कोकणचे अदानीकरण होऊ देणार नाही असा इशारा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिला. यादरम्यान ठाकरे यांनी सावंतवाडीचे आमदार दीपक केसरकर यांच्यावर टीका करताना खाली मुंडी पाताळ धुंडीमनी नाही भाव देवा मला पाव असे म्हणत केसरकर यांचा पराभव झाल्यानंतर सिंधुदुर्ग जिल्ह्याचे चांगले होईल असा टोला हाणला. दरम्यान राज ठाकरेंनी उद्धव ठाकरेंना पुन्हा एकदा टोला लगावला आहे. बाळासाहेब ठाकरेंची संपूर्ण हयात गेली काँग्रेसला विरोध करण्यात. पण स्वतः मुख्यमंत्री होण्यासाठी स्वतःच्या स्वार्थासाठी शिवसेना उद्धव ठाकरेंनी काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या दावणीला बांधली याला म्हणतात भूमिका बदलणं. मी कधीही माझ्या स्वार्थासाठी भूमिका बदलेली नाही असं राज ठाकरे वरळी या ठिकाणी म्हणाले.

# विकास विरोधी, शिवसेनेचा विचार काँग्रेसच्या दावणीला बांधलेले सरकार उलथवून टाकले

(पान १ वरून..) कल्याणमध्ये यशवंतराव चव्हाण मैदानात, डोंबिवलीत नांदिवली स्वामी समर्थ मठ भागात घेतल्या.


कल्याण ग्रामीणमध्ये सामान्यांच्या सुखदुखात सहभागी होणारा, नाती जपणारा, ती घट्ट ठेवणारा राजेश मोरे यांच्यासारखा हाडाचा शिवसैनिक उमेदवार म्हणून दिला आहे. लोकसभा निवडणुकीच्यावेळी कल्याण ग्रामीण मतदारसंघाने खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांना ८६ हजाराचे मताधिक्य मिळून दिले. मताधिक्याची हीच बैठक कायम ठेऊन आपण उमेदवार मोरे यांना आपण साथ द्यायची आहे, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

मागच्या वेळेस कल्याण ग्रामीणमध्ये आपण गाफील राहिलो. ती चूक यावेळी करू नका, असे सांगत सभा मोठी आहे म्हणून बेसावध राहू नका. जोमाने काम करून समोरच्या उमेदवारांचे अनामत रक्कम जप्त होईल, या दृष्टीने विकासासाठी काम करा, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. कल्याण लोकसभेत शिवसेनेचा खासदार आहे. आपला या भागात आमदार पण पाहिजे यासाठी काम करा. आणखी काही बोलायची गरज नाही. यासाठी आपला मुलगा पुरेसा आहे, असे सांगत त्यांनी खा. शिंदे यांचे विकास कामांवरून कौतुक केले.

# सृष्टीचे मूलस्वरूप सांगणारा 'पळसफुलांचा धम्मसोहळा'

माणूस भवताल वावरताना त्याच्या आयुष्यावर त्या सगळ्या गोष्टींचा परिणाम होत असतो. जो तो भोगत असतो. चढ-उताराचे हेलकावे त्याचे आयुष्य घडवत जाते. समाजात घडणाऱ्या घटना, बेभरवशाचे राजकारण व त्यातही फसवाफसवी, सामाजिक चळवळीचा उडालेला फज्जा, धमनिमांडलेले अवडंबर आणि त्याच्या आडून शोषकांची होत जाणारी बेरीज, सांस्कृतिक वातावरणाचे एकपात्री मोजमाप अशा सगळ्या परिप्रेक्षात संवेदनशील माणूस आपली अभिव्यक्ती घेऊन जीवंत राहण्याची धडपड करीत असतो. आपल्या अस्तित्वाच्या ठिणग्या दगडावर दगड घासून व्यक्त करीत असतो. अशा परिस्थितीत जगण्याबद्दलचे आकलन त्याचे रूंदावत जाते. वेळोवेळी भानावर येत असतो. अशीच जडणघडण त्याच्या जगण्याची मूलद्रव्य हीच त्याची साधन सामुग्री होत जाते. अव्यवस्थेने त्याला ग्रासले असते. तो अत्यंत संवेदनशीलतेने पाहत असतो. हीच वृत्ती त्याला कवी बनण्यास मदत करीत असते. त्याचे शब्द त्याच्या आतड्याची भाषा होऊन बसते. अशी आतड्याची भाषा बोलणारा तरूण कवी मुन्नाभाई नंदागवळी मला वेळोवेळी भेटत गेला. काही तरी करण्याची जिद्द आणि त्याची अस्वस्थता साद घालत होती. त्यासाठी त्याने अनेक प्रकारचे उपक्रम हाती घेतले. एक दिवसीय साहित्य संमेलन घेणे, छोट्याशा गावात का होईना परंतु विचारप्रवर्तक परिसंवाद आयोजित करणे, कविसंमेलनात भाग घेणे अशांमध्ये तो घडत गेला. प्राप्त परिस्थितीशी त्याची झगडण्याची वृत्ती ते त्याच्या असण्याचे प्रयोजन झाले. अशा धडपड्या व्यक्तीने मग एक दिवस 'सर, काव्यसंग्रह काढतो. प्रस्तावना तुम्हीच लिहा.' अशी गळ घातली. 'प्रा. डॉ. सुरेश खोब्रागडे तुला मदत करतील.' असे मी सुचवले आणि आज 'पळसफलांचा धम्मसोहळा' असे नाविन्यपूर्ण शीर्षक असलेला संग्रह आपल्या हातात आहे.

हे नाव मला खूपच अन्वर्थक वाटले. त्याचे कारण म्हणजे कवी गोंदिया जिल्ह्यातला. या जिल्ह्यात पळसाचे झाड खूप आहेत. पळसाच्या पानाला इकडे गोंड्या म्हणत होते. पुढे गोंड्या या शब्दाचा अपभ्रंश होऊन गोंदिया झाला. पळसाचे झाड हे ज्या प्रदेशात असतील तिथले जीवनमान हे साधे असेल. तिथली माणसेही साधीच असतील. कारण या झाडाचे नाते अतिसामान्य माणसाशी आहे. पळस फुलांच्या निसर्ग सौंदर्याने इथल्या सामान्य माणसांना नेहमीच भारावून टाकले आहे. पळस फुले हे माघ महिन्यात फुलारून येतात. जिकडे तिकडे पाहावे तर हे पळसफुलेच दिसतात. बुध्दाने वज्जींना सात तत्वांमध्ये संघाचा उपदेश दिलेला आहे. त्यासाठी भिखू एकत्र येतात. चिवरच्या रंगाने जवळ आलेल्यांच्याही कांत्या तुकतुकीत दिसायला लागतात. एका वर्गामुळे संघ हा प्रवाहपतित झालेला आहे. तर बुध्दाच्या चिवरचा रंग हा धर्माधिष्ठित समाजाच्या काठावर उभा आहे. म्हणून या रंगाला ओशर म्हणूया. हा वारा या काळात सगळीकडे वाहत असतो. या वाऱ्याने कवी मनाचा माणूस भारून जर उठला नाही तर तो मेलेल्यात जमा आहे. म्हणून या जीवंत कवीला मुन्नाभाई नंदागवळी याला वाटले- 'अरे, हा तर धम्म सोहळाच!' अशा स्थूल आणि सामाजिक बांधिलकीच्या घटकांचा परिणाम कवी मनावर होणे निश्चित आहे. अशा सौंदर्याचे वाण वैनगंगेने भरभरून वाटले आहे. अथांग इटियाडोह व नवेगावबांधचे निसर्गरम्य स्थळे हे कवीच्या गावाजवळ आहे. ते नेहमीच त्याला भूरळ घालतात.




येरंडी हे कवीचे गाव, गोंदिया-चंद्रपूर लोहमार्गावर असलेले. हृदयाला स्पर्श करणारे काही शब्द कवीने वापरलेले आहेच. अशा शब्दांची ऊर्जा क्रांतीच्या वाटेतली वाटेकरी आहे. ही कृती मला बहुआयामी वाटली. 'पळसफुलांचा धम्मसोहळा' हा क्रांतीनायकाचा चिरंतन शब्दसोहळा आहे. त्यामुळेच तो अधिक चिंतनशीलतेकडे घेऊन जाणारा आहे, यात वाद नाही.

'कितीतरी दिवसांपासून ऐकतोय पळसाला पाने तीनच कदाचित हे त्रिसरण तर नसावेत हे पळसफुले नाहीत, ते आहेत बुध्दाचा धम्म रुजविणारे अनुयायी' सामाजिक समतेच्या मनात विषमतावादी जोखड उलथवून टाकण्याचा अंगार फुलू लागत असताना विचार स्वातंत्र्याची पहाट त्याचवेळी उगवावी हा निव्वळ योगायोग नव्हे, तर बाबासाहेबांच्या समाजाच्या नवनिर्माणाचे एक टोकदार सूत्रच आपल्या हाती घेणे असा आहे.

ग्रामीण, वंचित, शोषितांचे जगणे कवीला नवीन नव्हते. यांच्या घामाचे आणि रक्ताचे मूल्य जीवनाशी चाललेला त्यांचा अविश्रांत संघर्ष हा कवीच्या विचारांचा पायाभरणी झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाच्या वैचारिकतेने त्याला उजेडगामी करून गेले. ते विचार पेरण्यासाठी त्याने पत्रकारिता केली आणि आता प्रबंधावर काम करतो आहे. त्यासाठी त्याने दोन विद्यापीठाच्या परीक्षा पास केल्या. जगण्याच्या परिप्रेक्षात संघर्षरत राहणे हे आता रोजचेच झाले आहे. एकंदरित अशी स्पंदने टिपणे मुन्नाभाई नंदागवळीच्या अंगवळणी झालेले आहे.

एखाद्याच्या तरूण वयात प्रेमाच्या ऐवजी विद्रोहाच्या भावना जागृत असणे ही बाब निश्चितच कठीण आहे. असे जगणे म्हणजे विचाराला विचार घासणे व तिथून उजेड निर्माण करणे होय. वीजांच्या वेगाने चपळ राहणे होय. अंधार पसरवणाऱ्यांपासूनच सावध राहणे होय. प्रतिक्रांतीवाद्यांची कारस्थाने उलथवून टाकणे होय. सारांश, कविता आणि जगणे यात कुठेही तफावत असता कामा नये. मुन्नाभाईला कवीसारखे जगावे असे सारखे वाटत असते. तसा तो प्रयत्नही करतो. त्यासाठी त्याचे मन हे सतत उद्रेकत असते. कविता करणे म्हणजे मी मेलेलो नाही असे जीवंतपणाचे प्रमाणपत्र घेऊन फिरणे होय. कविता करणे म्हणजे शक्यता शक्यतेची पडताळणी करणे होय. कविताविहीन राहणे म्हणजे कवीमनाच्या माणसाला मृत्यूजवळ करणे होय. या कवीला कवितेचे घरटे करून राहणे आवडते. त्या घरट्यात आपल्या चोचीने जमेल तशी काडी घेऊन कविता विणत राहणे हा मुन्नाभाईचा छंद मला आपला करून गेला. कवितांच्या चांदण्यात न्हावून निघायचे हा चंगच त्याने बांधला.

आम्हा माणसांच्या कविता माणुसकीच्या व्यवहाराने जगणाऱ्या माणसांकरिता कुठल्याही नरभक्षक किंवा पांढरपेशा लोकांना आम्ही मानवतावादी कविता समर्पित करीत नाही.

सौंदर्याच्या वावरात अशी मानवतावादी पेरणी होते. हे कवीचे जगण्याचे प्रयोजन आहे. माणसांच्या कविता दाहीदिशांच्या ओठांवर रुजवायचे आहे. नरभक्षकांना कविता समर्पित करून कुजवायची नाही. कवितेचे मातेरे झालेले चालणार नाही. अशा सुंदर पिकांची नासाडी कवीला मान्य नाही. असे कवितेचे प्रयोजन, कवितेच्या प्रयोजनाचा अर्थ आणि त्या कवितेच्या प्रयोजनाची महत्ता सामाजिक जाणिवेचे आशयसुत्रेच प्रकट करतात. ही बाणेदारपणाची महत्ता कवीच्या एका केंद्रिभूत जगण्याचे प्रमेय आहे आणि ते प्रमेय साध्यम सिध्देम आहे.

'कविता तू माझ्या पदरी रिकामी येऊ नकोस येताना बुध्द, फुले, शाहू आंबेडकरी विचार घेऊन ये. समुद्राच्या विद्रोही लाटेसारखे नको येताना प्रज्ञासूर्याचे चमचमणाऱ्या किरणांसारखे तेजस्वी माणसे घेऊन ये'

आबांची आठवण करून देणारी ही कविता आहे. कविते तू अशीच येऊ नकोस... कवी नसलेल्या लोकांच्या जगण्याच्या तऱ्हा ठरलेल्या आहेत. मात्र कवीचे तसे नसते. कवितेशी त्याचे जैविक नाते असते. कवितेच्या मुठीत बुध्द, फुले, शाहू, आंबेडकर असा धगधगता अवकाश आहे. हे युगानयुगे अंगाईगीत आहे. हे सतत रसरशीत राहणारे विचार आहेत. हे ऊर्जावंत आणि ऊर्जावर्धनही तत्वज्ञान आहे. तेव्हा कविता कवीच्या पदरी रिकामी आलेली कशी चालेल? कवीचा संवेदन स्वभाव असा आकांताने बोलू लागतो. जीवनाचे मोल तोलू लागतो. कविता ही आसवांच्या काळजाचा विचार घेऊन येणारी असावी असे कवीला वाटते. प्रज्ञासूर्याची चमचमणारी किरणे घेऊन येणारी तेजस्वी कविता आपल्या पदरी यावी ही कवीची एकमुखी मागणी व्यवस्थेची उभी-आडवी चिरफाड करणारीच वाटते.

एकदा रस्त्याने जात होतो वाटेत कार्ल मार्क्स भेटले ते खूपच चिंतेत दिसले बंदुकीच्या गोळ्या वाटताना मला राहावले नाही, मी म्हणालो, बुध्द तत्त्वाने करू शांती समताधिष्ठित समाजासाठी मिळुनी करू क्रांती'

१९६० नंतर प्रचलित शोषणाला विरोध करणारी व बाबासाहेबांच्या विचाराचा कल्याणकारी चेहरा घेऊन लिहिणारी पिढी उदयास आली. या कवितेवर मार्क्सवादी विचाराचाही भारी पगडा होता. हे बलदंड विचारवंत त्यांचे आदर्श होते. या कवींमध्ये सगळी मंडळी फकीर वृत्तीचे. त्यामुळेच ते शोषकांवर तुटून पडत. कारण यांच्याजवळ गमावण्यासारखे काहीच नव्हते. संरक्षणाची हमी असलेला सैनिक युध्द लढूच शकत नाही. त्यासाठी त्याला प्रथम असुरक्षित घोषित करावे लागेल. शोषकांविरूध्दचा आवाज असल्यामुळे त्यांना शोषणाची अभिव्यक्ती सांगणारी प्रारूपे आपली वाटली. आंबेडकरी साहित्याला क्रांतीची भाषा करण्यासाठी वैचारिक चार गोळ्या बाबासाहेबांनी पुरवल्या असतील तर त्यामध्ये एक गोळी मार्क्सची होती, असे वि.स.जोग सांगतात.

मग आंबेडकरी विचार आणि बुध्दाच्या विचाराला झाल्लर लावण्याची गरज आहे का? या साहित्याला अस्तराची भाषा लावणे म्हणजे हे साहित्य एकांगी आहे, एकारले आहे, अपुरे आहे असे म्हणण्यासारखे आहे. हे विचारच अत्त दीप आहेत. त्यामुळे या विचारावर चालणारेही साहित्य अत्त दीपच असेल. म्हणूनच कवीला मार्क्स गोळ्या वाटताना चिंतेत दिसतो. या गोळ्यांनी क्रांती होईल की नाही या भ्रमात असतो. अशा क्रांतीत हिंसा असते. रक्ताचा एक थेंबही न सांडवता आमुलाग्र समाज परिवर्तन हा विचार कवीला चिंतनीय वाटतो. सोबत बुध्द असल्याशिवाय ते शक्य नाही. बुध्द व मार्क्स या दोघांचाही जीवनवृतांत हा त्यांनीच घडवलेल्या व सतत वाढत्या वेगाने एका नव्या जगाकडे प्रवाहित होणाऱ्या कालखंडाचा इतिहास आहे. म्हणूनच बुध्द त्यावरचा जालीम उपाय आहे असे कवीला सुचवायचे आहे. समताधिष्ठित समाजसाठी आवश्यक तेथे सहकार्य व आवश्यक तिथे वैचारिक लढा ही ती भूमिका आहे. या भूमिकेपासून पळ काढण्याचा कवीचा निश्चितच विचार नाही, हे अधोरेखित व्हावे.

'गेले निळे-गेले पंचरंगी यांच्या हातात दिसतो बजरंगी समाजासह धम्मात नाही ठेवला नाक कुठे गेल्या चळवळी आणि आमचे लोक'

मूल्य व तत्त्वनिष्ठा आता हास्यापद झालेल्यांना आहेत. ज्यांना चळवळीची खरोखर तळमळ आहे असे लोक उद्ध्वस्त होत आहेत. विकले जाणारे मात्र सत्तेत रमत आहे. बाबासाहेबांशी बेईमानी करतो हा विचार जराही त्यांना शिवत नाही. बाबासाहेबांच्या हयातीतही काही जण चळवळ सोडून गेले नाही असे नाही. परंतु घराची एवढी दुर्दशा झालेली नव्हती. विकले जाणे ज्यांना गोल्ड मेडल वाटते ते अनिबंध तृष्णेच्या पुनर्रचनेकडेच जात आहेत. त्यांचे पोचट आणि बोटचेपे तत्वज्ञान समाजाला मारक आहेत. इतक्या मेलेल्यांचे शेजार नाकारणेच इष्ट आहे. आंबेडकरी चळवळीचा शरणागती गोतवळा पाहिला म्हणजे मन उद्विग्न होते. भावनेच्या काचा तडातडा तडकतात.

आता निळ्याचे व पंचशील ध्वजाचे जास्त चिंध्या झालेल्या पाहायचे नसेल तर नेमके मुद्दे मांडून विरोधकांना कोंडीत पकडणारे कार्यकर्ते तयार व्हावेत. चळवळीचा अभ्यास असावा. ॲक्शन प्लॅन हा त्याच्या जगण्याचा केंद्रबिंदू असावा. नुसते आक्रोशपणे बोलणे हा विचार होऊच शकत नाही. सामाजिक चळवळी म्हणजे सिध्दांतनिष्ठ राजकारण आहे हे जेथपर्यंत कार्यकर्त्याला समजणार नाही तेथपर्यंत बोटाची दिशा गवसणार नाही. हा धोका कवीने मांडून ठेवला आहे.

माय, बाप, रमाई, मूठभर माती, आयुष्य हे कवीला पेटवून गेले. बापाचा रापलेला चेहरा व मायच्या हाताला पडलेल्या भेगा कवीला जीवनाकडे डोळसपणे पाहायला शिकवतात तर रमाई अंगार फुलत ठेवणारी शांत, संयमी, तेवत राहणारी समई वाटते. अस्तित्वाच्या अस्मितेचा आलेख असा वरवर उंचावत जातो. अशा कविता फोल संस्कृतीच्या जवळ न जाणारा कवी मला उद्याचा आस्वादक चेहरा वाटतो. पुढच्या संग्रहात कवी नव्या दमाने झेप घेईल आशा व्यक्त करतो. पुढच्या वाटचालीस माझ्या मंगलकामना. जयभीम !

**- प्रा. युवराज गंगाराम, राजवाडा गणेशनगर, गोंदिया**

(पळस फुलांचा धम्मसोहळा काव्यसंग्रहातील प्रस्तावना (समीक्षा)

# अनिल सावंत यांच्या पदयात्रेला गावागावातून स्वागत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अनिल सावंत यांच्या संपर्क दौरा या पदयात्रा निमित्ताने गावांना भेट दिली असता गावकऱ्यांनी त्यांचे मोठा प्रतिसाद मिळत आहे व त्यांचे उत्साहात स्वागत केले.

देशाचे नेते शरदचंद्र पवार साहेब यांना केंद्रीय कृषिमंत्री असताना राज्यातील तसेच देशातील शेतकऱ्यांच्या काही अडीअडचणी असतात त्याचे त्यांना जाण असल्याचे पवार साहेबांच्या नेतृत्वात सर्वसामान्य शेतकरी बांधवांच्या विकासासाठी परिवर्तनाची ध्येय डोळ्यासमोर ठेवून या भागातील पाणी प्रश्न दूर करून पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघाचे मोठ्या प्रमाणात असलेले पाणी, शिक्षण आणि रस्ते या समस्या वरती आम्ही काम करणार असल्याचे मोती आज गरज आहे आणि याबाबत मी सर्वप्रथम जातीने लक्ष देऊन या भागाचे नंदनवन करण्याचा मला माणूस आहे. येथे निवडणुकीत असंच सहकार्य करून तुतारी वाजवणारा माणूस या चिनाव समोरील बटन दाबून विजयी करावे असे आव्हान अनिल सावंत यांनी ग्रामस्थांना केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार अनिल सावंत यांनी संपर्क दौरा व पदयात्रा या निमित्ताने केला व संपर्क दौरा व देता यानिमित्ताने आमदाबाद, शेटफळ, लक्ष्मी दहिवडी, लेंडवे चिंचाळ, गणेशवाडी, अकोली,कचरेवाडी या गावांना भेटी दिल्यावर गावकऱ्यांनी चर्चा करताना ते बोलत होती.

दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे चंद्र पवार पक्षाचे मान्यवर देखील उपस्थित होते एकंदरीत अनिल सावंत यांना मंगळा पंढरपूर भागातून मिळणारा प्रतिसाद महिलांचे मोठ्या प्रमाणात उपस्थित यावरून ग्रामस्थांचा पाठिंबा मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे.

यावेळी ग्रामस्थांनी विठ्ठलाचा तू वारकरी या विधानसभेचा तो मानकरी अशा प्रकारच्या घोषणा देऊन सर्व ग्रामस्थांनी आपला पाठिंबा अनिल सावंत यांना दर्शवला आहे. यावेळी ग्रामस्थ व नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



# शाळेच्या वाचनालयाला वाढदिवसानिमित्त पुस्तके भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इटकुर / सुधाकर रणदिवे : जिल्हा परिषद प्रशाला ईटकुर या शाळेमध्ये इयत्ता आठवी मध्ये शिकत असलेला प्रज्योत सुधाकर रणदिवे यांने त्याच्या साठवून ठेवलेल्या पैशातून त्याच्या वाढदिवसानिमित्त ५०० रुपयाची चार पुस्तके भेट म्हणून शाळेच्या वाचनालयाला दिली आहेत. वाढदिवसानिमित्त वायपट खर्च करण्यापेक्षा असा स्तुत्य उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पाडावी असा उपक्रम प्रत्येक विद्यार्थ्यांनी व पालकांनी करावा. आतापर्यंत बऱ्याच विद्यार्थ्यांनी कुठल्या ना कुठल्या निमित्ताने या शाळेच्या वाचनालयाला पुस्तके भेट म्हणुन देण्यात आलेली आहेत.

१) शिवचरित्र २) माझी आत्मकथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर ३) साने गुरुजींच्या गोड गोष्टी ४)थोरांचे विचार अशी पुस्तके देण्यात आले. वाचनालयाचे प्रमुख यादव मॅडम मार्गदर्शक क्षीरसागर सर, गरुडे सर व शाळेचे मुख्याध्यापक सी जी शिंदे सर यांनी या वाचनालयाचा उपक्रम चालू ठेवलेला आहे.

# देवळे गावात शहाजीबापू गटाला झटका, कार्यकर्त्यांचा दिपकआबांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : एकीकडे विधानसभेची रणधुमाळी सुरू असताना दुसरीकडे शहाजीबापू पाटील गटातील सध्याचे नेतृत्व पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्याला विश्वासात घेत नसल्याने तसेच अंतर्गत गटबाजीला कंटाळून सांगोला तालुक्यातील देवळे येथील शहाजीबापूंच्या कट्टर समर्थक कार्यकर्त्यांनी महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश करून ठाकरेंची धगधगती मशाल हाती घेतली आहे.

शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरेंच्या उपस्थितीत दिपकआबा साळुंखे पाटील यांनी शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर ठाकरेंच्या मशालीची सर्वात जास्त धग शहाजीबापू पाटील गटासह शेकापला जाणवली आहे. विधानसभेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून महाविकास आघाडीची अधिकृत उमेदवारी दिपकआबा साळुंखे पाटील यांना जाहीर झाल्यानंतर शहाजीबापू पाटील गटासह शेतकरी कामगार पक्षाला मोठी गळती लागली आहे. एक-एक करत अनेक नेते, पदाधिकारी कार्यकर्ते अखेरचा रामराम करीत पक्ष सोडून दिपकआबांच्या नेतृत्वाखाली काम करण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश करीत आहेत. देवळे गावातील शहाजीबापूंच्या कट्टर समर्थक कार्यकर्त्यांनी अखेरचा रामराम करीत दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून उध्दव ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना सांगोला तालुक्यातील देवळे येथील नितीन बाबासो सोनवले, सुग्रीव सोनवले, नंदकुमार सोनवले, नरेंद्र गाडे, मच्छिंद्र सोनवले, भीमराव कसबे, प्रवीण गाडे, शिवाजी सोनवले, अभिमान सोनवले, प्रकाश कांबळे, सुनील कांबळे, गोरख सोनवले, सचिन सोनवले, किसन जावीर, सलीम मुलाणी (मांजरी), समाधान वाघमारे, संजय जाधव या शहाजीबापू



गटाच्या कार्यकर्त्यांनी पक्षाला अखेरचा रामराम ठोकत दिपकआबांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश करून ठाकरेंची मशाल हाती घेतली. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संभाजीराजे शिंदे, उपजिल्हाप्रमुख सूर्यकांत घाडगे, शिवसेना तालुकाप्रमुख अरविंद पाटील, माजी सरपंच सचिन शिनगारे, नंदकुमार दिघे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शिवसैनिक उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### उद्धव ठाकरेंनी बाळासाहेबांची शिवसेना काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या दावणीला; राज ठाकरेंची टीका

मुंबई : महाराष्ट्रात निवडणुकीला अवघे काही दिवस उरले आहेत. प्रचारसभांना जोर आला आहे. २० नोव्हेंबरला निवडणूक आणि २३ नोव्हेंबरला निवडणुकीचा निकाल लागणार आहे. मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही त्यांचे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहेत. राज ठाकरे यांनी वरळीत दुसऱ्यांदा सभा घेतली आणि त्यांनी उद्धव ठाकरे तसंच शरद पवार यांच्यावर जोरदार टीका केली.

काही लोकांचा रडूबाई रडूबाई शो सुरु आहे. निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी तपासलं तर तपासलं. त्यात काय? मलाही तपासलं. ज्याच्या हातून पैसे सुटत नाहीत त्याच्या बॅगेत सापडतील का? निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनाही हे कळत नाही. सारखं मला मारत आहेत अरे कशासाठी? असं म्हणत राज ठाकरेंनी उद्धव ठाकरेंना पुन्हा एकदा टोला लगावला आहे.

बाळासाहेब ठाकरेंची संपूर्ण हयात गेली काँग्रेसला विरोध करण्यात. पण स्वतः मुख्यमंत्री होण्यासाठी स्वतःच्या स्वार्थासाठी शिवसेना उद्धव ठाकरेंनी काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या दावणीला बांधली याला म्हणतात भूमिका बदलणं. मी कधीही माझ्या स्वार्थासाठी भूमिका बदलेली नाही असं राज ठाकरे वरळी या ठिकाणी म्हणाले. मला ज्या गोष्टी पटल्या नाहीत त्यांच्या विरोधातही मी बोललो.

# महिलांच्या बँक खात्यात आमचे सरकार प्रति महिना जमा करणार रु. ३००० : हर्षवर्धन पाटील

## महिलांना मोफत एसटी प्रवास!, १८ वर्षे पूर्ण झालेवर मुलीस देणार रु. १लाख, महिलांना वर्षाला ५०० रुपयात ६ सिलेंडर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/प्रतिनिधी : अतुल सोनकांबळे

राज्यात निवडणुकीनंतर महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर येणार आहे. आमचे सरकार सत्तेवर आलेनंतर महालक्ष्मी योजना सुरु करून महिलांच्या बँक खात्यात प्रति महिना रु. ३००० प्रमाणे रक्कम जमा करणार आहे. तसेच महिलांना मोफत एसटी प्रवास, मुलींना १८ वर्षे पूर्ण झालेवर रु. १लाख रक्कम व महिलांना वर्षाला ५०० रुपयात ६ सिलेंडर देण्याचे जाहीरनाम्यात जाहीर केले आहे. आमचे महाविकास आघाडी सरकार हे महिला भगिनींचे सरकार असणार आहे, असे स्पष्ट प्रतिपादन इंदापूर विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार पक्षाचे व महाविकास आघाडीचे उमेदवार हर्षवर्धन पाटील यांनी केले आहे.

हर्षवर्धन पाटील यांनी मंगळवारी (दि.१२) सुरवड, पिंपरी बु., लाखेवाडी, निरवांगी, वरकुटे खु. या गावांचा झंझावती प्रचार दौरा केला. या दौऱ्यात सुरवड (ता. इंदापूर) येथील सभेत हर्षवर्धन पाटील यांनी महाविकास आघाडी सरकारने जाहीर केलेल्या जाहीरनाम्याची माहिती दिली.

हर्षवर्धन पाटील पुढे म्हणाले, शेतकऱ्यांचे रु. ३ लाख पर्यंतचे कर्ज माफ केले जाईल तसेच नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे. दुधाच्या उत्पादन खर्चानुसार प्रत्येक वर्षी दुधाला दर दिला जाईल. तसेच प्रत्येक कुटुंबाला रु. २५ लाखाचा आरोग्य विमा देणार आहेत. शिवाय सुशिक्षित बेरोजगार युवकांना दरमहा ४ हजार रुपयांची मदत केली जाईल, आदी जाहीरनाम्यातील लोकहिताच्या तरतुदींची माहिती हर्षवर्धन पाटील यांनी दिली.

हर्षवर्धन पाटील पुढे म्हणाले, इंदापूरच्या विद्यमान आमदारांना शरद पवारांनी आजपर्यंत २५ वर्षात भरभरून पदे दिली. तरीही त्यांनी ८४ वर्षीय पवार साहेबांच्या विरोधात जाऊन गद्दारी केली आहे. तसेच दुसऱ्या उमेदवारालाही शरद पवारांनी उद्योग धंदे उभारणीसाठी परवाने, सवलती, अनुदान आदी विविध प्रकारे मोठे सहकार्य केले आहे. त्यामुळे या विधानसभा निवडणुकीत आदरणीय पवार साहेबांना दोन्ही उमेदवारांनी विरोध केल्याने मतदारांनी त्यांना जागा दाखवून द्यावी, असे आवाहन हर्षवर्धन पाटील यांनी केले.

अनेक जाती-धर्माच्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात गेल्या २ दिवसात प्रवेश केला आहे. सन १९५२ पासून शंकररावजी पाटील (भाऊ) च्या शिकवणीनुसार सर्व जाती-धर्मांना बरोबर घेऊन आंम्ही काम करीत आहोत. इंदापूर तालुक्याचा आंम्ही सत्तेवर असताना २० वर्षांमध्ये केलेला सर्वांगीण विकास जनतेला माहित आहे, असेही हर्षवर्धन पाटील यांनी भाषणात नमूद केले.

### युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण!

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार हर्षवर्धन भाऊ पाटील यांना विधानसभा निवडणुकीमध्ये प्रचंड बहुमताने निवडून आणायचे आहे, या इर्षेने सुरवड, वकीलवस्ती, शेटफळ हवेली, भोडणी, पंधरवाडी, वडापुरी गावातील युवक वर्ग कामाला लागल्याचे चित्र या कार्यकर्ता बैठकीमध्ये दिसून आले. हर्षवर्धन पाटील यांचे बद्दल युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे या निवडणुकीचे वैशिष्ट्य दिसून येत आहे.**



यावेळी पक्षाचे तालुकाध्यक्ष अँड. तेजसिंह पाटील, शिवसेने (उबाठा) चे नितीन शिंदे, उदयसिंह पाटील, शिवाजी हांगे, बळीराम शिंदे, संजय कांबळे, शंकर शिंदे, संजय शिंदे, निलेश जगताप, अरुण पवार, प्रीतम देवकर, दादा तोबरे, ओंकार नलावडे, रुपनवर वकीलवस्ती, आदींनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक सुरेश मेहरे यांनी केले. यावेळी पक्षाचे कार्याध्यक्ष महारुद्र पाटील, विलासबापू वाघमोडे, अमोल भिसे, काँग्रेस पक्षाचे काका देवकर आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन सूर्यकांत फडतरे यांनी केले.

## खा.अमोल कोल्हे यांची तोफ निमगाव-केतकीमध्ये धडाडणार : हर्षवर्धन पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/प्रतिनिधी :अतुल सोनकांबळे





दि.१३/११/२४ इंदापूर विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष, काँग्रेस, शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्या महाविकास आघाडीचे उमेदवार, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या प्रचारार्थ शाहू-फुले-आंबेडकर यांचा वारसा राज्यामध्ये समर्थपणे पुढे चालविणारे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे खा. अमोल कोल्हे यांच्या जंगी प्रचार सभेचे आयोजन निमगाव केतकी येथे शनिवार (दि.१६) रोजी सायंकाळी ४ वा. करण्यात आले आहे.

सध्या राज्यभर खा.अमोल कोल्हे यांचा सभांचा धडाका जोरात सुरू आहे. खा. अमोल कोल्हे यांना मानणारा प्रचंड मोठा वर्ग संपूर्ण राज्यामध्ये सर्व क्षेत्रांमध्ये आहे. खा.अमोल कोल्हे हे खेड मतदार संघाचे खासदार असलेने पुणे जिल्ह्यामध्ये सामाजिक, राजकीय क्षेत्रात खा.अमोल कोल्हे यांच्या शब्दाला मोठा मान आहे. पुणे जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे व महाविकास आघाडीचे सर्व उमेदवार विजयी करणे संदर्भात खा.अमोल कोल्हे यांनी विशेष लक्ष दिले आहे. माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या प्रचारार्थ खा.अमोल कोल्हे यांचे विचार ऐकणे साठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाने केले आहे.

## निवडणूक कामात टाळाटाळ करणाऱ्यांवर होणार फौजदारी कारवाई : निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने पंढरपूर विधानसभा मतदारसंघात २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे तसेच २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. या निवडणूक काम काजाकरिता विविध आस्थापनांच्या मनुष्यबळाची नियुक्ती केली आहे. निवडणूक नियुक्त जे अधिकारी, कर्मचारी निवडणूक प्रशिक्षणास गैरहजर राहतील अथवा निवडणुकीच्या कामात हयगय करतील अशांवर लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ अंतर्गत फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी सांगितले आहे.

पंढरपूर विधानसभा मतदारसंघातील निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची आवश्यकता असल्याने मतदारसंघात आवश्यक अधिकारी, कर्मचारी यांची नियुक्ती केली आहे. निवडणुकीचे काम हे राष्ट्रीय कर्तव्य असून अशा प्रकारे जे कर्मचारी निवडणुकीसाठी त्यांना प्राप्त झालेले आदेश नाकारतील, निवडणूक प्रशिक्षणास गैरहजर राहतील अथवा निवडणुकीच्या कामात हयगय करतील त्यांच्यावर लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ अंतर्गत थेट फौजदारी कारवाई करावी, असे निर्देश निवडणूक निर्णय अधिकारी यांना जिल्हा निवडणूक कार्यालयाकडून देण्यात आले आहेत.

पंढरपूर विधासभा मतदार संघात मतदान प्रक्रिया व्यवस्थित आणि सुलभपणे व्हावी यासाठी मतदान यंत्राची हाताळणी, मतदान प्रक्रिया यासंबंधीचे सखोल ज्ञान तसेच मतदारांची गैरसोय होवू नये यासाठी घ्यावयाची काळजी आणि सर्व बाबींचे प्रशिक्षण संबंधित अधिकारी-कर्मचारी यांना देण्यात येत आहे. या प्रशिक्षणास गैरहजर राहिलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ अंतर्गत फौजदारी कारवाई करण्यात येईल. तसेच संबधितांवर गुन्हा दाखल करुन खाते अंतर्गत चौकशी लावण्यात येईल. त्यामुळे अशा अधिकारी व कर्मचाऱ्यांनी याबाबत नोंद घेऊन तत्काळ निवडणूक कर्तव्यावर हजर व्हावे, असे आवाहनही निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

## निवडणूक प्रक्रियेतील सुलभतेसाठी चक्रीका ॲपचा वापर बंधनकारक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : निवडणूक प्रक्रियेत सुलभता आणि कार्यक्षमता वाढण्यासाठी चक्रीका ॲप'चा वापर बंधनकारक असून निवडणूक नियुक्त अधिकारी कर्मचारी यांनी गुगुल प्ले स्टोअर मधून चक्रीका प डाऊन करावे असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

चक्रीका ॲप'द्वारे मतदान कर्मचाऱ्यांना मतदारांची तपशीलवार माहिती, मतदान केंद्रांचे निर्देश, आणि प्रक्रियेतील आवश्यक सूचना सहज मिळतात. मतदानाच्या वेळी उद्भवणाऱ्या तांत्रिक समस्यांवर त्वरित तोडगा काढण्यासाठी तसेच मतदानाचे अहवाल पाठविण्यासाठी हे ॲप उपयुक्त असून, निवडणूक नियुक्त अधिकारी कर्मचारी यांनी तात्काळ या पचा वापर करावा असे आवाहनही निवडणूक निर्णय अधिकारी श्री. इथापे यांनी केले आहे.

## डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांना निवडून आणण्यासाठी महिलांचा निर्धार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सांगोला विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी इंडिया लेन्स फोर स्कूल शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार डॉ. बाबासाहेब अण्णासाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ सांगोला शहराचे ग्रामीण भागात स्वर्गीय आबासाहेबांच्या कन्या शोभाताई पाटील, डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांच्या अर्धांगिनी डॉक्टर निकिता ताई देशमुख, मी तिला देशमुख यांच्या मार्गदर्शनाखालील जोरदार प्रचार सुरू आहे मतदारसंघातील विकासाला खेळ बसल्या असून आता तुम्ही साथ द्या, अशी साज डॉक्टर निकिता ताई देशमुख या महिला भगिनींना घालत आहेत.



या प्रचारफेरीत सुप्रिया देशमुख, स्वाती मगर, विद्या जाधव, फर्जना खाती, वैशाली झपके, स्मिता बनसोडे, सविता बनसोडे, रेखा बनसोडे, हिना मुलानी, वैशाली बहिरे, स्मिता बहिरे, स्मिता देशमुख, सुरेखा मदने, संजीवनी शिंगाडे, छाया एरंडे, नीतताई ढोबळे, सुरेखा सपाटे, उषा लोखंडे, राणी लवटे, नीता गुळ मेरे, निलोफर मुजावर, शुभांगी बनसोडे, कोमल भंडारे, स्मिता इंगोले , मीनाक्षी शेडगे, शोभा फुले, सुरेखा पवार पाटील, स्वाती गावडे, सुप्रिया माने, स्नेहा उमटेकर, अलका कोळेकर, कुसुम जानकर, अंजू माने, सीमा कांबळे, डॉक्टर मेघना देवकते, अर्चना शिंदे, नलीमा शिंदे, भिंगे मॅडम, छाया पाटील, उमर कांबळे, शोभा माळी, मंगल बनसोडे, राजश्री जाधव, शोभा खडतरे, ताई ढेरे, लता बनकर, मंगल चौगुले, राजश्री पाटील, चंद्रभागा माने, सुनिता लिगाडे, दीप्ती कुलकर्णी, कोमल भंडारे, योगिती तरकच बंद, अश्विनी धोंडे, माधुरी जाधव, स्वाती चव्हाण, श्रद्धा देशमुख, इंदिरा येडगे, गीता दौंडे, सुजता दौंडे, रूपाली मदने, उषा देशमुख, जय नायकुडे, पिंकू मदने, सविता लोखंडे, सविता बनसोडे, बनसोडे, कोमल सुरवसे, जरीना मोगल, यांच्यासह असंख्य महिला परिश्रम घेत आहेत.

**जाहीर सभा, गावभेट दौरे आणि होम टू होम प्रचाराबरोबरच शेताच्या बांधावर जाऊन प्रचार**

**'आपला माणूस' म्हणून मतदारांची पसंती**

# अभिजीत पाटील यांची प्रचारात आघाडी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/ प्रतिनिधी : माढा विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार अभिजीत पाटील यांनी प्रचारात जोरदार आघाडी घेतली असून गावभेट दौरे, राज्यस्तरीय नेत्यांच्या जाहीर सभा आणि होम टू होम प्रचाराबरोरच त्यांचे कार्यकर्ते आता थेट शेताच्या बांधापर्यंत जावून शेतकऱ्यांना विकासाचे व्हिजन सांगत आहेत. त्यामुळे 'आपला माणूस' म्हणून मतदारांची त्यांना पसंती मिळत आहे.


अभिजीत पाटील यांनी विठ्ठल सहकारी साखर कारखाना लोकशाही मार्गाने ताब्यात घेतला त्याच वेळी विधानसभा लढविण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर मागील तीन महिन्यात माढा मतदारसंघात खेळ पैठणीचा, होम मिनिस्टर, माढा कुस्ती केसरी, दहीहंडी, रक्तदान शिबिर, बैलगाडा शर्यत, आदी कार्यक्रम घेऊन आपले नाव घराघरात पोहचवले व कसल्याही परिस्थितीत माढ्याच्या रिंगणात उतरायचेच असे ठरवले. त्यातूनच जनमताचा कौल असणाऱ्या राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून उमेदवारी मिळविण्यात यश मिळवत अर्धी लढाई जिंकली. साहजिकच प्रतिस्पर्धी शिंदे गटाचे कट्टर विरोधक मोहिते-पाटील यांनी आपली पूर्ण ताकद पाटील यांच्या पाठीशी उभी करत प्रचारात उडी घेतली आहे. माजी उपमुख्यमंत्री विजयदादा यांच्यासह खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, शिवतेजसिंह मोहिते-पाटील प्रचारात दररोज सक्रिय आहेत. याशिवाय राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष्याचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व खासदार डॉ.अमोल कोल्हे यांच्या अनुक्रमे उपळाई (ता.माढा) व करकंब येथे जाहीर सभा झाल्या. त्यावेळी वातावरण निर्मिती होण्यास मदत तर झालीच पण अनेक नेते आणि कार्यकर्त्यांनीही श्री.पाटील यांना जाहीर पाठिंबा दिला. याशिवाय दररोजच्या गाव भेटी दरम्यानही अनेक कार्यकर्ते पाठिंबा देत आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे माढा तालुक्यातून माजी जिल्हा परिषद सदस्य भारत आबा शिंदे, संजय कोकाटे, संजय पाटील-घाणेकर, नितीन कापसे यांच्यासह टेंभुर्णी येथील कुटे आणि बोबडे परिवाराने श्री. पाटील यांच्या पाठीशी उभी केलेली ताकद निर्णायक ठरत आहे. दुसरीकडे रणजितसिंह शिंदे यांना शिवसेनेच्या शिवाजी सावंत आणि पंढरपूर तालुक्यातुन परिचारक गटाचा पाठिंबा जाहीर झाला असला तरी हे दोन्ही गट महायुतीचे घटक असल्याने श्री.शिंदे यांची उमेदवारी म्हणजे महायुतीचीच उमेदवारी असा समज पसरू लागला आहे. त्याचाही त्यांना फटका बसण्याची शक्यता आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे अभिजित पाटील यांच्यासाठी रोहित पवार आणि शरद पवार यांच्या जाहीर सभा होणार आहेत. अशा वरिष्ठ नेत्यांच्या प्रचार सभांचा पाटील यांना फायदा होत असताना श्री.शिंदे अपक्ष निवडणूक लढवत असल्याने त्यांना स्वतःलाच सर्व प्रचार यंत्रणा संभाळावी लागत आहे.





**पंढरपूर तालुक्यातील गृहभेटी दरम्यान शेतात असणाऱ्या शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन अभिजीत पाटील यांचा प्रचार करताना अनुराधा व डॉ.अमृता पाटील.**

## थोडक्यात...



### घरोघरी मतदार चिठ्ठ्यांचे वाटप सुरु

उमरगा/प्रतिनिधी : विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने येत्या २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी मतदारांना आपले मतदानाचे केंद्र, यादीतील क्रमांक आदीची माहिती असलेली मतदार चिठ्ठी वाटपास सुपतगावात सुरुवात झाली असून सर्व मतदारांपर्यंत निर्धारित कालवधीत मतदार चिठ्ठी पोहोचत व्हावी, यादृष्टीने प्रशासनाच्या वतीने नियोजन करण्यात आलेले आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदारांना आपले मतदानाचे केंद्र, मतदार यादीतील क्रमांक आदी माहिती सुलभरित्या उपलब्ध होण्यासाठी मतदार चिठ्ठ्या दिल्या जातात. मतदारांपर्यंत ह्या चिठ्ठ्या त्या त्या भागात नियुक्त मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्यामार्फत वितरीत करण्यात येत आहे. सुपतगाव येथील बीएलओ नागनाथ कांबळे, राजेश सूर्यवंशी यांनी मतदारांच्या घरोघरी जाऊन मतदार चिठ्ठ्या पोहोचविण्याचे काम केले जात आहे.मतदानाला जाताना एक आपला ओळखीचा पुरावा घेऊन जावे. मतदारांनी आपापल्या भागातील मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांशी समन्वय साधून आपली मतदार चिठ्ठी प्राप्त करून घ्यावी व २० नोव्हेंबर रोजी आपला मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन उमरगा तहसीलदार तथा निवडणूक निर्णय अधिकारी गोविंद येरमे यांनी केले आहे.

# डॉ. बाबासाहेब देशमुख हे निश्चित विधानसभेत जातील : खा. धैर्यशील मोहिते पाटील

## डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ खा. धैर्यशील मोहिते पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत तालुक्यात कॉर्नर सभा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला/प्रतिनिधी : गेल्या पाच वर्षात सांगोला तालुका कॉन्ट्रॅक्टर विळख्यातून बाहेरच निघाला नाही त्यामुळे सर्व सामान्य माणसांकडे बघायला लोकप्रतिनिधींना वेळच मिळाला नाही त्यामुळे सांगोला तालुक्याचा विकास करणे हेच आमच्या पुढील मोठे आव्हान आहे. येणाऱ्या काळात सांगोला तालुक्यात एमआयडीसी, चांगल्या दर्जाची शैक्षणिक संकुले उभारणार असल्याचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी सांगून आदरणीय पवार साहेबांनी आदेश दिल्याप्रमाणे आज मी डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या प्रचारासाठी आलो आहे. डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या डोक्यावरती पवार साहेबांचा हात असून डॉक्टर बाबासाहेब देशमुख हे निश्चित विधानसभेत जातील असा विश्वास व्यक्त केला.

सांगोला विधानसभा मतदार संघाचे महाविकासआघाडी-इंडिया अलायन्स पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार डॉ. बाबासाहेब आण्णासाहेब देशमुख यांच्या प्रचारानिमित्त माढा लोकसभा मतदार संघाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शिरभावी, मेडशिंगी, वाटंबरे, कडलास , सोनंद येथे जाहीर सभा संपन्न झाल्या. यावेळी डॉक्टर बाबासाहेब देशमुख, डॉक्टर अनिकेत देशमुख, ज्येष्ठ नेते बाबुराव गायकवाड, दत्ता सावंत यांच्यासह मित्र पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना खासदार धैर्यशील मोहिते पाटील म्हणाले की, ज्या कुटुंबामागे पवार साहेब संपूर्ण हयात भर ठामपणे उभे राहिले अशा लोकांनी त्यांच्याशी गद्दारी करणे कितपत योग्य आहे असा सवाल उपस्थित करून, लाभ घेतलेल्यांनी पवार साहेबांशी गद्दारी केली त्यामुळे जनतेने आता ठरवले आहे की पवार साहेबांबरोबर जे लोक इमानदार राहिले त्यांना निवडून द्यायचे त्यामुळे पवार पवार साहेबांचा डोक्यावरती हात असणारे सर्व उमेदवार विधानसभेत जातील असा विश्वास व्यक्त करत सांगोला तालुक्यातील नागरिकांनी शेतकरी कामगार पक्षाच्या पाठीमागे ठामपणे उभे राहावे असे आव्हान त्यांनी केले.

**खा.मोहिते पाटील यांनी सांगोला मतदारसंघात शेतकरी कामगार पक्ष आणि महाविकास आघाडीचे उमेदवार बाबासाहेब देशमुख यांच्या प्रचार सभांचा धडाका लावल्याने विरोधी गोटात अस्वस्थता निर्माण झाली आहे. खा. मोहिते पाटील यांच्या प्रचारामुळे डॉ. बाबासाहेब देशमुख हेच महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार असल्याचे स्पष्ट झाले आहे.**

महाविकास आघाडीचे तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या सांगोला येथील एन्ट्रीने तालुक्यातील नेत्यांची हवा टाईट झाली आहे. मोहिते-पाटील यांनी शेकापचे डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या प्रचाराचा धडाका लावल्याने डॉ. बाबासाहेब देशमुख हेच महाविकास आघाडीचे सांगोला तालुक्यातील अधिकृत उमेदवार असल्याचे स्पष्ट होताना दिसत आहे.



बोलताना डॉक्टर बाबासाहेब देशमुख म्हणाले की, स्व. आबासाहेबांनी सूतगिरणी काढून रोजगार निर्मितीचे काम केले आहे.तालुक्यातील दोघांनी आजपर्यंत रोजगार निर्मितीसाठी काय काम केले याचा जनतेने विचार केला पाहिजे. गेल्या पाच वर्षात प्रस्थापितांनी गोरगरिबांच्या मुलांचे जीवन उध्वस्त करण्याचे काम केले असून वाळू व्यवसाय कडे मुलांना आकर्षित केले गेल्यामुळे आज तरुण वर्ग व्यसनाधीनेकडे मोठ्या प्रमाणात गेला असल्यामुळे आता विचार करण्याची वेळ आली आहे.

यावेळी बोलताना अतुल पवार म्हणाले की, डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांना पाठिंबा देत असताना मी माझ्या एकट्याच्या जीवावर पाठिंबा दिला नसून माझ्या जीवाभावांच्या कार्यकर्त्यांच्या माझ्या पाठीमागे असणाऱ्या सर्वसामान्यांच्या जीवावरती पाठिंबा दिला आहे. गेल्या पाच वर्षात तालुक्यात व्यावसायिक राजकारण झाले असून मेडशिंगीचे कोविड सेंटर तालुक्यातील चुकीच्या माणसांनी बंद केले अशा चुकीच्या माणसांना तालुक्याच्या राजकीय पटलावरून बाहेर केले पाहिजे असे सांगत मी जातीपातीच्या राजकारणाला मानणारा कार्यकर्ता नाही. यापुढे सर्वसामान्यांचा ठोस विकास करण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाच्या पाठीमागे खंबीरपणे उभा राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# उमेदवार आण्णा दराडे यांच्या प्रचारार्थ तिसरी पिढी सक्रिय : आण्णा दराडे यांची तीन वर्षाची कन्या गावोगावी जाऊन करते प्रचार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के.गायकवाड) : तुळजापूर विधानसभा मतदारसंघात रोजच्या रोज प्रचाराच्या रणधुमाळीचे तापमान वाढत असून प्रत्येक उमेदवार आपापल्या परीने सभा,बैठका, पदयात्रा,घरभेटी असा वेगवेगळ्या प्रकारचे आपापला प्रचार करताना दिसत आहे.

या प्रचाराच्या रणधुमाळीत प्रहार जनशक्ती पक्षाकडून निवडणूक लढवित असलेले तिसऱ्या आघाडीचे उमेदवार आण्णा दराडे यांच्या प्रचारार्थ त्यांची तिनं वर्षाची कन्या धनिष्ठा दराडे ही आपल्या आईसोबत प्रचारात सक्रिय आहे.खऱ्या अर्थाने हा लोकशाही उत्सवाचा आनंदच अनुभवास मिळतो आहे.

तुळजापूर विधानसभा मतदारसंघात पंचरंगी लढत होते आहे असं म्हटलं जातं परंतु महाविकास आघाडीचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार कुलदीप उर्फ धिरज आप्पासाहेब पाटील आणि महायुतीचे भाजपचे उमेदवार राणाजगजितसिंह पाटील उर्फ राणा दादा यांच्यातच खरी लढत आहे असे राजकीय जानकरांना वाटते आहे.तर दिवसेनदिवस समाजवादी पक्षाचे उमेदवार देवानंद भाऊ रोचकरी, तिसऱ्या आघाडीचे प्रहार जनशक्ती पक्षाचे आण्णा दराडे व वंचित बहुजन आघाडीच्या डॉ.स्नेहा सोनकाटे यांना ही या मतदारसंघातून चांगला प्रतिसाद मिळत आहे.त्यामुळे या मतदार संघात पंचरंगी लढत होऊन नेमका विजय कोणाचा होईल हे सांगता येत नाही असे वाटते.

एकंदरीत तुळजापूर विधानसभा मतदारसंघात राजकीय वातावरण तापले असून विजयाचे दावेदार मानले जाणारे महाविकास आघाडीचे धीरज पाटील व महायुतीचे राणाजगजितसिंह पाटील यांना म्हणावं तसं विजय सोपा राहीलेला नाही.

या निवडणुकीत प्रचाराच आकर्षण म्हणजे तिसऱ्या आघाडीचे उमेदवार आण्णा दराडे यांच्या प्रचारार्थ त्यांची तिनं वर्षाची कन्या धनिष्ठा दराडे ही आपल्या आईसोबत प्रचारात सक्रिय झाली असून मतदारांना मतपत्रिका दाखवून तिसऱ्या आघाडीचे उमेदवार आण्णा दराडे यांच्या बॅट या चिन्हा समोरील बटन दाबून शेतकरी पुत्र आण्णा दराडे यांना विजयी करा असी विनंती करत आहे.यामुळे लोकशाही उत्सवाचा खरा आनंद मतदारांना अनुभवास मिळतो आहे.

# निवडणुकीच्या कामकाजात महसूल सेवक अव्वल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : राष्ट्रीय निवडणुक आयोगाने निवडणुका घोषित करताच राज्यसह अक्कलकोट तहसील प्रशासनाने जोरदार तयारी सुरु केली असून त्याच पार्श्वभूमीवर महसूल विभागाचे कान, नाक, डोळे, समजले जाणारे महसूल सेवक हे हिरहिरीने निवडणुकीचे काम करताना पाहायला मिळतात. अक्कलकोट चे तहसीलदार विनायक मगर यांच्या मार्गदर्शनाखाली व ग्राम महसूल अधिकारी, महसूल सहायक, यांच्या समवेत हाती पडेल ते काम हे महसूल सेवक पूर्ण करण्याचे काम करतात. शिवाय महसूल सेवक हा निवडणुकीच्या कामकाजात अतिशय तरबेज असून, उण, इण, ततझढ पेरिंग करणे, एम -३बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट, व व्हीव्हीपॅड, मशीन वापर,निवडणुकीतील नवीन कायदे, तरतुदी व अध्यावत सूचना, पोस्टल मतदान, व निवडणूक कार्य प्रमाणपत्र, मशीन सिलिंग, व व्हीव्हीपॅड ची डूज अँड डोन्ट्स, संकलन केंद्र, स्ट्राँग रूम मधून पेट्या बाहेर काढणे, ठेवणे, मतदान पूर्व, मतदान दरम्यान, मतदान समाप्तीवेळी करावयाची कामे, मतदान याद्या बाणफुली शिक्का, तसेच साहित्याचे काम, मतदार व मतदानाकरिता लागणाऱ्या सर्व बाबी ह्या त्यांना नेहमीच्या असल्याने त्यांना निवडणूकिचे कामकाज करणे अगदी सोयीचे ठरत असताना पाहायला मिळत आहे.

विधानसभा निवडणुकीच्या कामकाजात तालुका अध्यक्ष शपीक वाडीकर जिल्हाध्यक्ष विठ्ठल गुरव, रेवण सुतार, प्रविणकुमार बाबर,शिवानंद कोळी सुनील मुलगे, दीपक कांबळे सोमनाथ आलुरे , जाकीर कागदे, वीरभद्र आकाश घंटे स्वामी, दत्ता कोळी, फिरोज तांबोळी ,हनुमंत सानप, सैपन पठाण,स्वामीनाथ जमादार महादेव, अर्जुन सनके, जगदीश देसाई, चांगदेव चव्हाण,चंद्रकांत तळवार, सुचिता काळे,अनिल जमादार,प्रवीण गुंजले, सूर्यकांत रामपुरे, ममता कोळी, श्रीमंत कोळी, मल्लिनाथ कळशेट्टी, सोमनाथ जमादार, काशिनाथ माने, चौडप्पा कुंभार, राजेंद्र पाटील, रेणुका कुंभार, बाबू कोरबू, शिवशरण कोळी, यांच्यासह तालुक्यातील ५२ महसूल सेवकांचे कामकाज युद्धपातळीवर सुरु आहे.

# आ. आवताडे यांचे ब्रह्मपुरी, बठान, उच्चेठाण , मुंडवी, धर्मगाव येथे स्वागत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आमदार समाधान दादा अवताडे यांच्या माध्यमातून माहिती सरकारच्या विकास भुमुख धोरणाची अडीच वर्षात यशस्वी अंमलबजावणी करून प्रस्तावित झालेल्या कामाची पूर्णत्येसाठी करण्यात आलेल्या गाव भेट प्रचार दौऱ्याच्या निमित्ताने भाजप महायुती व मित्र पक्षाची उमेदवार समाधान आवताडे यांनी ब्रह्मपुरी येथे भेट घेऊन ग्रामस्थांनी संवाद साधला.

माहिती सरकारच्या कल्याणकारी योजना व प्रकल्पाच्या माध्यमातून ब्रह्मपुरी येथे झालेल्या विकास कामाचा आढावा यावेळी समाधान दादांनी घेतला.

तसेच पुढील काळात असेच अनेक ग्राम विकासाची कृषी विकासाची व महिला सबलबीकरण प्रकल्प आणि गतीने पाठपुरावा करून मार्गी लावण्यात २० तारखेला महायुतीची कमळ या चिन्हावरील बटन दाबून प्रचंड जन आशीर्वाद पुन्हा लोकसेवेची संधी द्यावी अशी विनंती समाधान आवताडे यांनी केली.

सदर प्रसंगी आमदार दादा श्री यांचे सहकारी श्री संत दामाजी सहकारी सरकारी माजी संचालक खरेदी विक्री संघाचे विद्यमान संचालक युवक नेते राजेंद्र पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार व अभिष्टचिंतन केले.

याप्रसंगी माहितीचे कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामस्थ ही मोठ्या संख्येने उपस्थित होते

# आमदारांनी कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडले तिथे सर्वसामान्य जनतेचे काय: अनिल सावंत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/ प्रतिनिधी : आपला विरोधक फक्त भाजप आणि विद्यमान आमदार आहे गेल्या दोन निवडणुकीमध्ये त्यांनी मोठ-मोठे आश्वासने दिली त्यामुळे त्यांना जनतेने निवडून दिले जनतेने त्यांच्यावर विश्वास ठेवून त्यांना निवडून दिले पण त्यांनी काय केले, जेवढा निधी त्यांनी आणायचा तेवढा विकास झाला का? जिथे आमदारांनी कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडले तिथे सर्वसामान्य जनतेचे काय? म्हणून म्हणून सर्वसामान्य जनतेने आपला माणूस म्हणून मला संधी द्यावी त्या संधीचे मी सोने करून दाखवीन अशी ग्वाही पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे महाविकास आघाडीचे राष्ट्रवादी चरचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार अनिल सावंत यांनी केले आहे कोर्टी या गावांमध्ये सावंत यांची प्रचार सभा संपन्न झाली यावेळी कोर्टी गावातील तसेच महाविकास आघाडीतील पदाधिकारी कार्यकर्ते तसेच गावातील ग्रामस्थ बहिणी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, लक्ष्मी टाकळी येथील आमदार समाधान आवताडे गटाची नेते श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे माजी निमंत्रित संचालक प्रमोद देठे, कल्याणराव काळे गटाचे माजी सहकार शिरोमणी वसंत काळे सहकारी साखर यांच्या माजी संचालक महादेव देठे माजी ग्रामपंचायत सदस्य. बुधवारी अनिल सावंत यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला तसेच लक्ष्मी टाकळी त्यांना टाकळी मधून मतात मताधिक्य देऊन निवडून आणण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत अशी ग्वाही प्रमोद देते यांनी दिली आहे यांच्या पक्षप्रवेशामुळे समाधान आवताडे यांना धक्का बसला आहे.



## राज ठाकरे यांना पत्र लिहून भूमिपुत्र व आगरी समाजाने दिला पाठिंबा

## शिवसेनेने भुमिपुत्रास उमेदवारी न दिल्याने स्थानिकांनी व्यक्त केला रोष

# ‘भिवंडी पूर्व’मध्ये ‘मनसे’च्या मनोज गुळवी यांना भूमिपुत्रांचा पाठिंबा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी : भिवंडी पूर्व विधानसभा मतदारसंघात भुमिपुत्र व स्थानिक आगरी बांधवांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार मनोज वामन गुळवी यांना जाहीर पाठिंबा दिला असून तसे पत्र मनसे प्रमुख राज ठाकरे यांना पाठवले आहे. तसेच राज यांनी भिवंडीत सभा घेवून गुळवी यांच्या प्रचारार्थ सभा घ्यावी, अशी विनंती येथील भूमिपुत्र व आगरी बांधवांच्या संघटनांनी केली आहे.

राज ठाकरे यांना पाठवलेल्या पत्रात भूमिपुत्रांच्या संघटनेने म्हटले आहे की, राज्याचे मँचेस्टर असलेल्या भिवंडी पूर्व मतदारसंघात महायुतीने अमराठी व्यक्तीला उमेदवारी दिली आहे. महाविकास आघाडीचा उमेदवार स्थानिक भूमिपुत्र नाही. मनसेने स्थानिक भूमिपुत्र मनोज गुळवी यांना दिलेली उमेदवारी स्वागतार्ह असून आमचा आपल्या उमेदवारास जाहीर पाठींबा आहे.

**राज यांनी भिवंडीत सभा घेण्याची स्थानिक भूमिपुत्र बांधवांची विनंती**

मनसे उमेदवार मनोज गुळवी यांचा स्थानिकांशी दांडगा संपर्क आहे. त्यांना स्थानिक प्रश्नांची जाणही आहे. गुळवी यांच्या मागे पक्षाने ताकद उभी करणे गरजेचे आहे. त्यासाठी भिवंडीत आपण सभा घ्यावी. त्यामुळे मराठी मतांची फाटाफूट टळेल आणि भिवंडी पूर्वमधील नागरिकांना स्थानिक भूमिपुत्र लोकप्रतिनिधी मिळेल,असे राज ठाकरे यांना पाठवलेल्या पत्रात स्थानिकांनी म्हटले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने येथे अमराठी उमेदवारी दिल्याबद्दल स्थानिकांच्या संघटनांनी रोष व्यक्त केला आहे. शिवसेना कायम भूमिपुत्रांची कड घेत आलेला पक्ष आहे. मात्र यावेळी शिवसेनेने अमराठी उमेदवार देऊन आमचा अपेक्षाभंग केलाआहे, असा रोष भिवंडीतील स्थानिक भूमिपुत्रांनी राज यांना पाठवलेल्या पत्रात व्यक्त केला आहे.

भिवंडी पूर्व मतदारसंघात अपक्षांसह ११ उमेदवार रिंगणात आहेत. त्यामध्ये महाविकास आघाडीकडून समाजवादी पक्षाचे विद्यमान आमदार रईस शेख, महायुतीकडून संतोष शेट्टी आणि मनसेचे मनोज गुळवी यांच्यात खरी लढत होत आहे.